ब्रम्हपुरी शहरातील **कोट तलावाच्या** पर्यावरण संवर्धनासाठी नगरपरिषदेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामासाठी निधी मुक्त करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**
शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०१०/प्र.क्र.३४/तां.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः १७ मार्च, २०१२

वाचा:- १) ब्रम्हपुरी नगरपरिषदेचे पत्र क्र. कावि/नपब्र/बांध/२०१२/१५, दि. २१ जानेवारी, २०१२
२) विभागाचा सम क्रमांकाचा शासन निर्णय दि. ९ मार्च, २०१२.

**प्रस्तावनाः-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेतंर्गत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सन २०११-१२ या आर्थिक वर्षात ब्रम्हपुरी नगरपरिषद, ब्रम्हपुरी यांचेमार्फत प्राप्त कोट तलावाच्या प्रस्तावास नियोजन विभागाच्या सहमतीने संदर्भाधीन दि. ९ मार्च २०१२ च्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने ब्रम्हपुरी शहरातील कोट तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी निधी मुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनांतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत ब्रम्हपुरी शहरातील कोट तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी मंजूर एकूण रु.४४७.२१ लाखांपैकी अनुज्ञेय राज्य हिस्स्यांचे ९० टक्के म्हणजेच रुपये ४०२.४० लाखापैकी, **या शासन निर्णयाद्वारे रुपये २.०० कोटी (अक्षरी रूपये दोन कोटी फक्त)** मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगरपरिषद, ब्रम्हपुरी यांना मुक्त करण्यास संदर्भाधीन दिनांक ९ मार्च २०१२ च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. यासाठी **मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगरपरिषद, ब्रम्हपुरी (Chief Officer, Bramhapuri Municipal Council, Bramhapuri) यांचे नावे रुपये २.०० कोटी (अक्षरी रूपये दोन कोटी फक्त) एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.**

**३.** "ब्रम्हपुरी नगरपरिषदेस अदा करावयाचा रू.२००.०० लाख अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून **मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगरपरिषद, ब्रम्हपुरी** यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.दे.के.मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री.श्या.ना.धकाते, सहसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगरपरिषद, ब्रम्हपुरी** यांना **रू.२.०० कोटी (अक्षरी रूपये दोन कोटी फक्त)** अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर बाबीसाठी होणारा खर्च मागणी क्र. यू-४,३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण-०४-प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण (१०३) वायु व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना-(३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात राज्य सरोवर संबर्धन योजनासाठी एकूण रू.८००.०० लक्ष एवढी तरतुद मंजुर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

५. तलावाची सद्यस्थितीतील खोली (depth) ची शास्त्रीय पध्दतीने मोजणी करून मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगर परिषद यांनी सादर करावी. सद्यस्थितीतील तलावाच्या पाण्याची Quality (PH, BOD, COD, TDS, turbidity, heavy metal, Colour इ. सह) विषयक अहवाल निधीची वापर सुरू करण्यापूर्वी सादर करावा. योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगरपरिषद यांची असेल.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अंदाज २०११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३ दिनांक ५-३-२०१२च्या सूचनांनुसार वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र १००८/विनियमन दिनांक १५ मे २००९ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला उप विभाग तीन मधील अनुक्रमांक ४, नियम क्रमांक २७ (२) अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन निर्गमित करण्यात येतआहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(दे.के.मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
मुख्याधिकारी , ब्रम्हपुरी नगरपरिषद. .
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, कार्यासन-१४६२, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.